Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# महात्मा जोतीराव फुले : कृषी क्षेत्रातील एक अभ्यास

**डॉ पिपळपल्ले आर. आर.**
संशोधन मार्गदर्शक
आदर्श कॉलेज, हिंगोली.

**शातलवार रमाकांत शिवाजीराव**
संशोधक विद्यार्थी

**प्रस्तावना :**

एकोणोविसाव्या शतकात सुधारणाविषयक विविध चळवळी झाल्या. प्रबोधनात्मक लेखन झाले. परंतु यातील बहूसंख्या सुधारणा आणि प्रबोधनात्मक लेखन हे प्रामुख्याने उच्चवर्णियांच्या भोवती घोटाळत होते हे आता हळुहळु मान्य होऊ लागलेले आहे तेथे महात्मा जोतीराव फुले यांचा एकमेव अपवाद होता हे नोंदवावे लागते महात्मा जोतीराव फुले यांनी चिंतन व लेखन शुद्र अतिशुद्र आणि स्त्री हे त्यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. शूद्र व अतिशूद्र आणि स्त्री यांचा विचार करताना त्यांच्यावर होणाऱ्या जातीय अन्यायायाच विचार महात्मा जोतीराव फुले यांनी नाही जातीय रचनेमुळे त्यांची आर्थिक दुर्दशा कशी झाली होती याचाही सांघत विचार त्यांनी कळकळीने केला आणि त्यांतुन त्यांचे लेखन ग्रंथ स्वरूपात मांडले महात्मा जोतीराव फुले यांनी एकुणच लेखनांला तीन स्तरांत उपेक्षीत वर्गाच्या द्रारिद्रयांचा दु:खाचा वेध घेत असताना ते आपल्या समकालीन समस्यांची पाळेमुळे इतिहासात कशी दडली आहेत हे सिध्द करीत जातात परंतू महात्मा फुले समकालीन सुधारकांनी कधी शेतीबदल विचार करावा का वाटले नाही.

**विषय निवडणेचा हेतू** –

प्रस्तुत विषय निवडणेच हेतू म्हणजे महात्मा जोतीराव फुले यांचा तात्कालीन परिस्थिती शेतकरायची अवस्था व विसाव्या शतकातील शेतऱ्याच्या अवस्था या प्रमुख घटकांचा अभ्यास हेतू विषयाची निवड करणेत आली.

**ग्रहितके** –

1) महात्मा जोतीराव फुले यांनी केलेल्या शेतक-यांचा कार्याचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्द्ती —**

प्रस्तुत विषयकरिता चरित्रात्मक विश्लेषणात्मक संशोधन पध्द्तीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्याकरिता प्रथम व्दितीय व इतर सहकारी ग्रंथ मासिके यांचा आधार घेऊन प्रस्तुत शोधनिबंधाची मांडली केली जाणार आहे.

**१) शेतकऱ्यांचा आसुड-**

'शेतकऱ्यांचा आसुड' हा महात्मा जोतीराव फुले यांचा अतिशय महात्वाच ग्रंथ होय, आतापर्यतच्या भारतीय इतिहासात शेतीचा एवढ्या गंभीरपणे कुणी विचारच केला नव्हता. " भारत देशातील एकुण परंपराच अशी की पुस्तिकी शाब्दिक ज्ञानाची ओझी वाहणारे श्रेष्ठ आणि संबधीत अर्थव्यवस्थेचा कणा वाहणारा कष्टकरी समाज मात्र उपेक्षीत ! अप्रतिष्टित !! महात्मा जोतीराव फुले यांनी शेतकरी-कष्टकरी हा प्रतिष्टित असला पाहिजे आणि शेती हि उत्तम पाहिजे. या दुष्टीने प्रथमच विचार मांडले." [1] महात्मा जोतीराव फुले यांनी स्वतःचे तत्वज्ञान विकसित करीत असताना परंपरेचा डोळसपणे अभ्यास केलेला होता. बळीची कथा भागवत पुराणातील कथेची टिंगल करीत अगदी नव्या-पध्द्तीने सांगितले आहे. हा एका मोठा विचारवंत म्हणुन महात्मा फुले यांचे सामर्थ यावेळी दुष्टिटपत्तीस येते. " महात्मा जोतीराव फुले म्हणतात बळीचे वाढते सामर्थ आणि दरारा आर्यांना सहन झाला नाही म्हणुन वामन नावाच्या राज्यावर हल्ला केला या लढाईत बळी मृत्युमुखी पडला त्याची पत्नी विधवा सती गेली. वामनाच्या सेन्याचे ऐन दसऱ्याच्या दिवशी राजधानीत प्रवेश केला आणि शहर लुट केली. म्हणुन आजही म्हणतात कि त्यांनी दसऱ्याच्या दिवशी सोन्याची लुटले जाते.”[2]

**२) शेतकऱ्यांच्या मुलांची अनावस्था**

महात्मा जोतीराव फुले यांनी बंड केला नाही, त्यांना सामाजिक क्रांती पाहिजे होती. समाजात बदल झाला पाहिजे, परिवर्तन झाले पाहिजे असे त्यांना सतत वाटत असे. "सुदैवाने शिक्षणाची संधी उपलब्ध झाली, सरकार दरबारी नोकरी मिळाली अशी शेतकऱ्याची पोरे महात्मा जोतीरावांच्या काळीही होती पण आजच्या सत्ताधारी शेतकरी पुत्रासारखीच त्यापैकी कोणी शेतकऱ्याच्या अवस्थेकडे लक्ष देईल तर हराम ! अशा शेतकरी पुत्रावर त्यांनी कडाडुन असुड फडकावला आहे." [3]

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

"शिक्षणशिवाय दीन दलित, पिडीत शोषित, मागासवर्गीय, शुद्र यांच्या मनात स्वातंत्र्याची बिजे पेरल्या जाणार नाहीत, शिक्षणाशिवाय त्यांच्या मनातील धर्मांध, पुराणप्रिय, अंधश्रद्धा युक्त कर्मठ व जुन्या विचारांना मुठ माती दिल्या जाणार नाही. ह्याबदल त्यांचे ठाम मत होते." [4] "मुलांना शिक्षण देण्यासाठी शेतकऱ्याजवळ पैसा नसतो. मजा मारीत फिरणाऱ्या इंग्रज अधिकाऱ्यांना त्यांच्या गाऱ्हाण्याकडे लक्ष घावयास वेळ मिळत नाही. ते अधिकारी आपल्या हाताखालील ब्राह्मण नोकरांच्या सल्ल्यानुसार काम करतात. शेतकऱ्याच्या संग्रही कुंटुंबाला पुरेल इतके धान्य नसते अंगावर वस्त्र नसते." [5] ही शेतकऱ्यांची अनास्था होण्यामागे दोनचं कारण आहे ती बनावट व जुलमी धर्म, आणि सरकारी खात्यातील ब्राह्मणांचे प्राबल्य "शेतकरी आणि उच्चवर्णिय यांच्या लढयाचे स्वरूप आर्थिक होते यांची जाणीव महात्मा जोतीराव फुले यांना झालेली होती. म्हणुनच भट ब्राह्मण शेतकऱ्यांचे कसे शोषण करतात यांचे मोठे सविस्तर आणि प्रभावी चित्रण त्यांनी येथे केले आहे."[6]

### 3) भारतातील पहिली शास्त्रीय विचार पध्दती

"महात्मा जोतीराव फुले यांचे कौतुक हे जगाच्या उप्पतीपासुन ते शेतकऱ्यांचा दुर्दशेपर्यतचा त्यांचा हा एक सलग होता एक धाग्याने विणलेले हे महावस्त्र होते यातुर, मातुर, चिंध्यांची गोधडी नव्हती, युरोपियन परिस्थितीत मार्क्स पहिली शास्त्रीय विचारपध्दती उभारली होता. त्यावेळी मरामोळा जोतीराव फुले तितक्याच तोलाच्या प्रतिभेने एक संपूर्ण विचार पध्दती मांडत होता. तत्कालीन देशाच्या दुरावरयेची सुरुवात त्यांच्या दुष्टिने इंग्रजी अंमला पासुन झालेली नव्हती हजारो वर्षाचा हा राग होता."[7] महात्मा जोतीराव फुले यांचे लक्ष आता एक महत्वाच्या सामाजिक सुधारणेकडे ओढले गेले होते ते व्यवहारदक्ष समाज सुधारक असल्यामुळे त्यांच्या बुद्धीला ज्या धार्मिक रूढी आणि घातुक सामाजिक चालीरिती पटत नव्हत्या, त्यांच्यावर प्रहार कराव्यास त्यांनी आरंभ केला सामाजिक सुधारणेची दरवाजे त्यांनी उघडले स्वातंत्र्य, समता , बुद्धीप्रामाण्यह्यांच्या पायावर त्यांना समाजाची नवीन रचना करावयाची होती."[8]

### 4) जोतीराव फुले आणि मार्क्स

"शेतकरी कष्टकरी वर्गाच्या प्रश्नाला त्यांनी व्यापक भुमिकेतुन हात घातला. शेतकऱ्यांच्या शेषणांचे ग्रामविभागतील हे प्राथमिक चक्र होते. दुसरे चक्र होते."सरकारी खात्यात भट कामगारांचे

महसुल खाते, जंगल खाते न्याय खाते शिक्षण खाते, पोलिस खाते अशी एकमेकांना संबंधित असणारे सर्व खाते नव्याने सुरु झाली होती धर्मद्रष्टीने जो प्रतिष्टित वर्ग होतो तोच या खात्यामधुन शिरला होता."[9]

मनुष्य प्राण्याचा विचार तितका स्थलकाल सापेक्ष म्हणुन मर्यादीतच महात्मा जोतीराव फुलेची पाळेमुळे जशी शेतकरी वर्गात होती तशी जर मार्क्सची असती तर युरोपियन देशातील कामगाराच्या श्रमशक्तीच्या शोषण पेक्षा वसाहतीतील शेतकऱ्याच्या श्रमशक्तीचे शोषण जास्त महत्वाचे आहे हे त्याला कळले असते."[10] सुदम निरीक्षण बुद्धिवादी द्रष्टीकोण, विचारांची प्रखरता, आणि रूढी परंपरा शोधुन त्यापलीकडील अर्थकारण शोषणारी चिंतनशीलना ही महात्मा जोतीराव फुले यांच्या व्यक्तीमहत्वाची खास वैशिष्टये शेतकऱ्याच्या जीवनाचा विकास, शेती सुधारल्या शिवाय होणे नाही. म्हणुन शेतकऱ्यांचा वैयक्तिक जीवनातील सुधारणाबरोबर त्यांच्या शेतीचा विकास झाला पाहिजे असा आग्रह त्यांचा होता.

"शेती सुधारण्यासाठी त्यांनी शेती संबंधीत अत्याधुनिक ज्ञान शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे तर संबधीचे ग्रंथ त्यांना उपलब्ध झाले पाहिजे."[11] जसे मार्क्सच्या काळात हा भांडवलदार व कामगार यांचा संघर्ष झाला. तसेच "आज जो कष्टकरी व शेतकरी आणि पुरोहित - सावकार वर्ग यांच्यात संघर्ष निर्माण झाला तो केवळ तत्कालीन नाही. अनादिकाळापासुन चालत आलेला संघर्ष आहे."[12] शेतकरी सावकाराविना राहु शकणार नाही असे आढळुन "यांना दारिऱ्द्यातून बाहेर काढण्याचा आमच्या मते एकच मार्ग दिसतो तो म्हणजे त्या वर्गाच्या मनावर स्वावलंबन आणि प्रामाणिक काबाडकष्ट करणे या गुणाचे महत्व बिंबविणे हा होय."[13] योग्य श्रममुल्य मिळाले पाहिजे हे सांगणारे मागच्या शकातील हे महात्मा जोतीराव फुले एकमेव सुधारक व समाजचिंतक होते, हे लक्षात घेतली म्हणजे महात्मा जोतीराव फुले यांची उंची आधिक वाढल्याचे दिसते.

**निष्कर्ष –**

शेतकऱ्यावर होणारे अत्याचार एक क्रांतिकारी विचार व कृती हि महात्मा जोतीराव फुले यांची मांडणी केली आहे. महात्मा जोतीराव फुले यांनी आपले संपूर्ण जीवन दिनदुबळया, गरीब व पीडित शेतकऱ्यांचा संपूर्ण आयुष्यचा सर्वांगीण विकास होणेच्या दृष्टीने भूमिका मांडली आहे.

**संदर्भ ग्रंथ -**


१) हरि नरके (संपा ) (२०१८) महात्मा जोतीराव फुले गौरवग्रंथ महात्मा फुले चरित्र साधने प्रकाशन समिती मुंबई पाचवी आवृती , पु ५२५

२) हरि नरके (२००६) महात्मा जोतीराव फुले: शोधाच्या नव्या वाटा , प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन पाचवी आवृती पु. १९९

३) कित्ता पु.१७०

४) यु. पि. इंगोले (२०१६) महात्मा फुले : शैक्षणिक सिध्दांन्त आणि कार्य आशिष प्रकाशन यवतमाळ पु. १२३

५) धनंजय कीर (२००६) महात्मा जोतीराव फुले पॉप्युलर प्रकाशन मुंबई पु. २२९

६) हरि नरके (संपा ) (२००६) महात्मा जोतीराव फुले : साहित्य आणि चळवळ , डॉ. बाबासाहेब आंबेडकर महात्मा फुले , राजर्षी शाहु चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई पु. ३७६

७) हरि नरके (संपा ) (२००६) शोधाच्या नव्या वाटा, प्रधान संचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई पु. १७४

८) धनंजय कीर (२०१२) महात्मा जोतीराव फुले पॉप्युलर प्रकाशन मुंबई पु.१०२

९) जातिपर्व (२०१०) नागनाथ कोत्तापल्ले स्वरूप प्रकाशन औरंगाबाद पु. ५०/५१

१०) महात्मा फुले: शोधाच्या नव्या वाटा, प्रधान संचिव उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन मुंबई पु. १९२

११) जातिपर्व (२०१०) नागनाथ कोत्तापल्ले स्वरूप प्रकाशन औरंगाबाद पु. ५५

१२) कित्ता पु. ५५

१३) धनंजय किर पु. २५८